# प्रेसनोट

दि.११/१२/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | एम.आय.डी.सी. पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)निकिता जितेंद्र शिरसाठ, वय–४६ वर्ष, पद–तलाठी सजा शेंडी, वर्ग–३, ता.नगर,जि.अहमदनगर<br>२)संकेत रणजित ससाणे, वय–२६ वर्ष, तलाठी शिरसाठ यांचे खाजगी मदतनीस, रा.निर्मल नगर, तपोवन रोड, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे मौजे शेंडी गावातील शेत जमिनीची खरेदीची नोंद करण्यासाठी व इतर तीन गटातील वडिलोपार्जित मिळकतीची हक्क सोड नोंद करण्यासाठी श्रीमती शिरसाठ, तलाठी सजा शेंडी यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयाकडे आज दि.११/१२/२०२३ रोजी प्राप्त झाली होती.त्यानुसार आज दि.११/१२/२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली असता यातील आरोपी लोकसेविका शिरसाठ यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे जमिनीची खरेदीची नोंद करण्यासाठी व इतर तीन गटातील मिळकतीची हक्क सोड नोंद करण्यासाठी ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम त्यांचे खाजगी मदतनीस संकेत रणजित ससाणे याच्याकडे देण्यास सांगितली. त्यानुसार आज दि.११/१२/२०२३ रोजी आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान भोसले अमृततुल्य नाष्टा सेंटर, नगर–छत्रपती संभाजी नगर रोड, अहमदनगर येथे आरोपी संकेत रणजित ससाणे याने तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष ५०,०००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यास रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत दोन्ही आरोपींविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर